नवीन सेवार्थ प्रणालीमध्ये वेतन
देयके सादर करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

वित्त विभाग, मंत्रालय,
शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण १००७/प्र.क्र. ११२/ भाग १/कोषा प्रशा. ५,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २१ सप्टेंबर २०१२.

**संदर्भ** :- शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १००७/ प्र.क्र. ११२/ भाग १/कोषा प्रशा. ५,
दिनांक ८ मे, २०१२.

**प्रस्तावना:**

उपरोक्त संदर्भांकीत शासन परिपत्रकान्वये राज्यातील सर्व आहरण व संवितरण अधिका-यांना नवीन सेवार्थ प्रणालीमध्ये देयके सादर करण्याबाबतच्या सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर सूचनांच्या अनुषंगाने राज्यातील आहरण व संवितरण अधिका-यांनी त्यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांची माहिती सेवार्थ प्रणलीवर भरुन सदर प्रणालीतून मासिक वेतन देयके आहरित करण्यासाठीची कार्यवाही सुरळीतपणे सुरु केलेली आहे. परंतु, असे आढळले आहे की, काही आहरण व संवितरण अधिका-यांनी अद्याप त्यांच्या कार्यालयातील बिलग्रुप्स (Bill Groups) प्रमाणे सर्व देयके सेवार्थ प्रणालीतून सादर करणे सुरु केलेले नाही. त्यामुळे सेवार्थ प्रणालीच्याशिवाय हस्तलिखित स्वरुपातील देयके स्वीकारताना कोषागारांना अडचणी येतात व सेवार्थ प्रणालीतून राज्यभरातील एकूण कर्मचा-यांची संख्या व वेतनावरील खर्च निश्चित करण्यास अडचणी निर्माण झालेल्या आहेत. याचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे .

**शासन परिपत्रक :**

राज्यातील आहरण व संवितरण अधिका-यांमार्फत सेवार्थ प्रणालीद्वारे वेतन देयके सादर होणे आवश्यक असल्याने व या संदर्भात या पूर्वी वेळोवेळी सूचित करण्यात आले असल्याने शासनाने आता असे ठरविले आहे की, सप्टेंबर देय ऑक्टोबरचे मासिक वेतन देयक त्यापुढील कालावधीसाठी सर्व प्रकारची देयके, पुरवणी देयकांसह सेवार्थ प्रणालीतून काढून सादर करणे आवश्यक राहिल.

कोषागारात सेवार्थ प्रणालीशिवाय काढलेले हस्तलिखित देयक स्वीकारण्यात येतील परंतु सदर हस्तलिखित देयक सादर करणारे आहरण व संवितरण अधिकारी यांचे वेतन प्रदान करण्यात येणार नाही याची सर्व आहरण व संवितरण अधिका-यांनी नोंद घ्यावी. कोषागार अधिका-यांनी सुध्दा सदर सूचनेचे काटेकोरपणे पालन करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून,त्याचा संगणक संकेतांक 201209251028210700 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( स. अ. मु. नकवी )
**उपसचिव, वित्त विभाग.**

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख
महालेखापाल १ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र,मुंबई
महालेखापाल २ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र,नागपूर
महालेखापाल (वाणिज्यिक लेखा परीक्षा)-, महाराष्ट्र,मुंबई
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
प्रबंधक,उच्च न्यायालय (मुळ शाखा), मुंबई
प्रबंधक , उच्च न्यायालय (अपील शाखा),मुंबई
प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय,मुंबई
प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासयकीय न्यायाधिकरण,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
संचालक, लेखा व कोषागारे,मुंबई
संचालक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
सह संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, पुणे, नाशिक, नागपूर,अमरावती, औरंगाबाद, कोकण भवन,नवी मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व उप कोषागार अधिकारी
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, कोषा प्र.५, वित्त विभाग.